जा.क्र.प्राफसंकें./आ.कृ.प.कें./ 2872 /२०२०
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग.
दिनांक : 23 SEP 2020

प्रति,

..........................................
..........................................
..........................................

**विषय** : कंत्राटीपध्दतीने प्रक्षेत्र सहाय्यक नियुक्ती करणेबाबत...

महोदय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे प्रक्षेत्र सहाय्यक या पदाची ठेका पध्दतीवर तात्पुरती नेमणूक करणेकरिता सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. अर्हताधारक उमेद्वारांची खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरती ठेका पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. सदर ठेका पध्दतीने काम करु इच्छिणाऱ्या उदमेद्वारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, कामकाजाचे अनुभव आणि अपेक्षित वेतन इत्यादी बाबी नमूद करुन त्यांचे अर्ज/दरपत्रक दिनांक ०८/१०/२०२० पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | प्रक्षेत्र सहाय्यक | १ | १) कृषि विद्यापीठ मान्यता प्राप्त कृषि विद्यालयातून कृषि पदविका अभ्यासक्रम पूर्ण<br>२) प्रक्षेत्रावरील कामाचा किमान ५ वर्षे अनुभव आवश्यक<br>३) विद्यापीठ प्रक्षेत्रावरील कामाच्या अनुभवास प्राधान्य देण्यात येईल. |

वरील तात्पुरती नेमणूक खालील अटी व शर्तींना अधिन राहून करण्यात येत आहे.

१) सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ठेका पध्दतीचा आवश्यकतेप्रमाणे करण्यात येईल.
२) इच्छुक उमेदवारांनी आपला प्रती महिन्याचा दर दरपत्रकात नमुद करावा.
३) दरपत्रकासोबत सर्व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती तसेच रहिवाशाचा पुरावा छायांकित प्रतींसह जोडणे आवश्यक आहे.
४) सदर तात्पुरता ठेका, कामाचा उरक आणि अचुकता इत्यादी बाब समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सदर ठेका रद्द करण्यात येईल.
५) संबंधित उमेद्वाराने ठेका संपण्यापूर्वी सदर ठेका रद्द करावयाचा असल्यास त्याने तशी आगाऊ सुचना देणे आवश्यक आहे. जर तशी आगाऊ सुचना न दिल्यास संबंधितांकडून एक महिन्याचा मेहनताना वसूल करण्यात येईल आणि अशा व्यक्तीचा ठेका भविष्यात विचारात घेतला जाणार नाही.
६) कामकाजाचे स्वरुप पाहून सदर ठेका सुरु ठेवावा किंवा कोणतेही कारण न दाखवता केव्हाही समाप्त केला जाईल.
७) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र. एसएलपी – ५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळणेबाबत हक्क राहणार नाही.
८) प्रक्षेत्र सहाय्यक म्हणून काम करण्यासाठी लघूत्तम प्राप्त दराचा ठेका स्विकारण्यात येणार असून प्रत्यक्ष या कार्यालयात/प्रक्षेत्रावर काम करताना झालेल्या इजा/दुखापती किंवा अपघात यांस हे कार्यालय कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाही.
९) कोणतेही प्राप्त दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे बाबतचे तसेच कोणतेही कारण न देता सदरील प्रकिया रद्द करणेबाबतचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.

कळावे,

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग.